जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-37/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 04.03.2021

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) चे प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. मोहीनी विजय येवनकर,** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 12.03.2021 रोजी दुपारी 03.00 वाजता ONLINE व्दारे आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**नगरसचिव कार्यालयाचा प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बालकल्याण समितीच्या खालील (11) सदस्यांची मुदत दिनांक 18.03.2021 रोजी संपत असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सुधारीत कलम 31(अ) मधील तरतुदीनुसार व महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज नियम 4-ब नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व माहिला व बालकलयाण समितीवर नविन नामनिर्देशनाव्दारे 11 (अकरा) सदस्यांची नियुक्ती (स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती केलेल्या सदस्यांप्रमाणे) पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शिक्षण व महिला व बालकल्याण समितीवर नियुक्ती करणे बाबत.

01) मुळे कविता संतोष, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
02) बिरकले सरिता बालाजीराव, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
03) नेरलकर अपर्णा ऋषीकेश, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
04) पाटील संगिता विठ्ठल, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
05) कापुरे गितांजली रामदास, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
06) आयेशा बेगम शेख असलम, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
07) यादव प्रभा ईश्वरलाल, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
08) गोडबोले ज्योत्सना राजू, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
09) अरशीन कौसर मोहम्मद हबीब, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**

10) खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ, **भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष**

11) गुपिले बेबीताई जनार्धन, **भारतीय जनता पार्टी**

<u>आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव</u>

**विषय क्रं. 02**

**विषय :-** <u>विधुत दाहिनी संच देणगी स्वरुपात स्विकारणे व नामकरण करणे</u>

नांदेड शहरात मृत शरीरास पारंपारिक पध्दतीने म्हणजे लाकडाचा इंधन म्हणुन वापर करुन दहन केले जाते. त्यासाठी पर्यायाने वृक्षतोड होते तसेच हवेचे प्रदुषणही होते, हे पिडादायक आहे. त्यापेक्षा पर्याय म्हणुन विधुत दाहिणीचा / गॅस दाहिणीचा वापर होणे गरजेचे आहे.

डॉ. उमेश मोहन भालेराव यांनी स्व. डॉ. मोहन भालेराव यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांच्या नावाने विधुत दाहिणी प्रकल्प उभा व्हावा. त्यासाठी `` **विधुत दाहिणी संच** `` देणगी स्वरुपात देण्याचा मानस असल्याचे कळविले आहे. `` **विधुत दाहिणी संच** `` देणगी दिल्यानंतर त्यास `` **स्व. डॉ. मोहन भालेराव दहनभुमी** `` असे नामकरण करण्याबाबत सुचविले आहे.

देणगीदाराच्या सहकार्याने देणगी घेवुन त्यास लागणारी आवश्यक तेवढी जागा व बांधकाम, शासकीय परवाना, देखरेख, अमंलबजावणी, निगा व काळजी मनपा प्रशासनास करावी लागणार आहे.

तसेच गोवर्धन घाट येथील स्मशानभुमी शांतीधाम या नावाने प्रचलीत असुन ते सर्वांना ज्ञात आहे. विधुत दाहिणी संच / गॅस दाहिनी संच देणगी स्वरुपात स्विकारुन विधुत दाहिनी संचास / गॅस दाहिनी संचास `` **स्व. डॉ. मोहन भालेराव** `` विधुत/गॅस दाहिनी संच असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**विषय क्रं. 03** **(प्राप्त दि. 02.03.2021)**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील प्रभाग क्रं. 11 मधील मंजुर विकास आराखडयातील रस्ता क्रं. 09 ते रस्ता क्रं. 24 पर्यंतचा रस्ता तयार करणे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 11 मधील मंजुर विकास आराखडयातील रस्ता क्रमांक 09 ते रस्ता क्रमांक 24 पर्यंतचा रस्ता तयार करणे बाबत मा. उपमहापौर यांनी पत्राव्दारे कळविले आहे. त्याअनुषंगाने सदर ठिकाणी पाहणी केली असता सदरील जागा हि कापुस संशोधन केंद्राची जागा आहे. सदर प्रस्तावित रस्ता 600.00 मी. लांबीचा असुन मंजुर सुधारीत विकास आराखडयानुसार 12.00 मी. रुंदीचा आहे. सदर रस्त्याचा विकास करतांना मनपाकेची शाळा बाधीत होणार असुन सदर शाळेची पर्यायी व्यवस्थसा करावी लागणार आहे.

सदरील रस्ता केल्यास देगलुर नाका भागात दररोज होणारी वाहतुकीची कोंडी निर्माणर होणार नाही तसेच सदर रस्त्याचा पर्यायी पळण रस्ता म्हणुन वापर होऊ शकतो.

करिता मंजुर सुधारीत विकास योजना आराखडयातील प्रस्तावित रस्त्यांची जागा संपादीत करणे व त्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>

**विषय क्रं. 04** **प्रस्ताव**

अमृत योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत पाणी पुरवठा कामाचे निविदा मागवुन कंत्राटदारास कामे देण्यात आली होती सदरच्या कंत्राटदारास कामे करण्याचे आदेश देवुन आजपावेता 2-3 वर्ष होत आहे तरीही अद्याप पर्यंत कांही प्रभागात कामे सुरु करण्यात आलेली नाही तसेच कांही प्रभागात अर्धवट कामे करुन दिलेली असुन जे अद्याप पर्यंत पुर्ण केलेली नाही.

तरी सदरच्या कंत्राटदारस देण्यात आलेले काम रद्द करुन शिल्लक असलेल्या निधीतुन उर्वरीत कामे करण्यासाठी प्रभाग निहाय निविदा मागवुन कामे करुन घेण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- शबाना बेगम मो. नासेर **अनुमोदक** :- स. शेर अली महेबुब अली

**विषय क्रं. 05** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत विविध भागा मध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत व रमाई आवास योजने अंतर्गत स्वत: घरकुल बांधकाम करणेसाठी नागरीक महापालिके मध्ये अर्ज दाखल करीत आहेत. परंतु त्याठिकाणी वेगवेगळे आरक्षण व पुररेषा असल्यामुळे घरकुल बांधकाम करण्यास परवानगी मिळत नाही. नांदेड शहरातील गरीब व गरजू नागरिक वर्षानुवर्षे ज्यांनी स्वकष्टाने प्लॉट विकत घेऊन असून कच्च्या घरामध्ये राहत आहेत. तसेच नागरीक ज्याठिकाणी राहत आहेत त्या आरक्षित जागेवर पाणीपुरवठा लाईन, रसते, नाली, दिवाबत्ती इत्यादी सुविधा मनपाकडून पुरविण्यात येतात तसेच सदरील लोक मनपा कराची हि भरणा करतात.

तसेच मनपाकेची आर्थीक स्थिती बरोबर नसल्यामुळे आरक्षणाची जागा मनपा विकसीत करु शकत नाही. परिणामी नागरिकांना मुलभुत सुविधापैकी पक्के घरकुलापासून वंचित रहावे लागत आहे. करिता याव्दारे नागरीकांच्या स्वमालकीच्या प्लॉटवर आरक्षण तथा पुररेषा मध्ये (आवश्यक उंचीवर) रहिवास करिता घरकुल बांधकाम करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला साब, अ. लतीफ अ. मजीद

**अनुमोदक** :- शबाना बेगम मो. नासेर, सय्यद शोएब

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 130 दिनांक 21.12.2020 अन्वये शहरात कोरानामुळे 22 मार्च 2020 पासुन लॉकडॉन लागल्यामुळे नागरीकांनी आपले मालमत्ता कर व पाणी पट्टी कर भरलेली नसल्यामुळे महापालिकेची वसुली झालेली नसल्याकारणाने नागरीकांचे मालमत्ता कर व पाणी पट्टी करारवर थकबाकी वरील लावण्यात आलेली शास्ती 15 फेब्रुवारी-2021 पर्यंत 100% माफ करण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील मालमत्ता कर व पाणी पट्टी करावर थकबाकी वरील लावण्यात आलेली शास्तीची मुदत 31 मार्च 2021 पर्यंत 100% माफ करण्यासाठी हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- सौ. ज्योती किशन कल्याणकर **अनुमोदक** :- दयानंद वाघमारे

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

मनपा हद्यीत गाडीपुरा भागातील गणपती मंदिर कमान ते जामा मस्जीद पर्यंत अस्तित्वात असलेला रस्ता 18 मि. रुंद केल्यास एम.जी. रोड वरील वाहतुक कोंडी कमी होऊन वाहतुक सुरळीत होईल. करिता सदर रस्ता 18 मी. रुंद करण्यासाठी भुसंपादन कार्यवाही करण्या करिता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व पुढील वैधानिक कार्यवाही मा. आयुक्त यांनी करावी.

**सुचक** :- भानुसिंह रावत **अनुमोदक** :- प्रकाशकौर खालसा

**विषय क्रं. 08** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्यीतील चैतन्यनगर परिसरातील श्री महादेव मंदीर ते पिरबु-हाण चौक मार्गे शास्त्रीनगरकडे जाणारा रस्ता हा अत्यंत महत्वाचा पर्यायी मार्ग असून या मार्गावर कायम लहान मोठया वाहनांची वर्दळ असते. या मार्गावर मंदीर व मस्जीद असून त्याठिकाणी जाणा-या भाविकांची संख्या मोठी

आहे व या मार्गावरुन नेहमी अवजड वाहने सुध्दा ये जा करीत असतात, परंतु अवजड वाहनांमुळे या वर्दळीच्या रस्त्यावर अपघात घडत आहेत व भ्विष्यातही एखादा अपघात घडून अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. **त्यामुळे चैतन्यनगर परिसरातील श्री महादेव मंदिर ते पिरबु-हाण चौक मार्गे शास्त्रीनगरकडे जाणा-या रस्त्यावर अवजड वाहनांना प्रवेशबंदी करणेसाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**सुचक** :- किशोर स्वामी, दयानंद वाघमारे **अनुमोदक** :- फारुख अली खान इलीयाज खान

**विषय क्रं. 09** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी सोलार बिड बसविणे.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका तर्फे स्टेडीयम परिसरात असलेल्या अभ्यासीकेच्या सुविधेसाठी नियम व अटी अद्यावत करणे बाबत.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक**:- नागनाथ गड्डम

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मंजुर विकास आराखडयातील A झोन मधील आरक्षण क्रं. 26, 27 ला लागुन असलेला 15 मी. रुंदीचा DP रस्ता संपादन करणे बाबत

**सुचक** :- महेश कनकदंडे **अनुमोदक**:- विरेंद्रसिंघ गाडीवाले

**विषय क्रं. 12** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मंजुर विकास आराखडयातील झोन E मधील आरक्षण क्रं. 6 ते उर्दु घर पर्यंत रस्ताकडे येणारा 15 मी. रुंदी रस्ता संपादीत करणे बाबत.

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला साब **अनुमोदक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले

**विषय क्रं. 13** **प्रस्ताव**

इंदिरागांधी मैदान विकसीत करणे बाबत

**सुचक**:- विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- गड्डम नागनाथ

**स्वाक्षरीत/-**

**( स. अजीतपालसिंघ संधू )**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**